# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 16/12/2019 (सोमवार)
# (सकाळ)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. केळवद :– दिनांक 15/12/2019 रोजी पो. स्टे. केळवद यांना मुखबिराद्वारे खबर मिळाली की, पांढुर्णा ते नागपूर जाणाऱ्या हायवे रोडनी एका 10 चक्का ट्रक क्र. एम एच–17/एच एच –1803 मध्ये अवैधरीत्या कत्लीसाठी गौवंशाची वाहतुक केली जात आहे. अशा माहिती वरुन पो. स्टे. केळवद स्टाफ पांढुर्णा रोड हायवे क्र. 47 वरील बिहाडा फाट्यावर नाकाबंदी केली असता 04:30 वा. दरम्यान एक 10 चक्का ट्रक क्र. एम एच–17/एच एच –1803 वाहन भरधाव वेगाने येतांना दिसला. त्याला थांबविण्याचा इशारा दिला असता त्यातील चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन न थांबविता नागपूरच्या दिशेने भरधाव वेगाने चालवुन पळविले. तेव्हा त्या वाहनाबाबत संशय आल्याने वाहनाचा पाठलाग केला असता सदर वाहन चालकाने त्याचे वाहन मौजा बिहाडा फाटा पांढुर्णा हायवे येथे सोडुन अंधराचा व जंगलाचा फायदा घेत पळुन गेला. दरम्यान 10 चक्का ट्रक क्र. एम एच–17/एच एच –1803 ची पाहणी केली असता सदर वाहनात एकुण 19 गाई गौवंश व 21 गौरे गौवंश एकुण 40 गाई जनावरे किमती 6,00,000/– रु. अत्यंत क्रुर व निर्दयतेने पाय व तोंड दोरीने बांधुन दिसले, तसेच ट्रकच्या खालच्या डाल्यात मागील भागात 2 सागवन लाकुड कि. 1,000/–रू. असा एकुण वाहनासह कि. 16,00,100/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस स्टेशन केळवद अप क्र. 271/2019 कलम 11(1)(घ)(ड)(च) प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतीबंधक अधि. सह कलम 5 (अ),9 महा. सरंक्षण अधिनीयम 1965 सहकलम 179,184 मो वा का 1988 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलिस नाईक राजेन्द्र रेवतकर 9823862180 हे करीत अहेत.

सदरची कार्यवाही ही श्री राकेश ओला, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा.,मा. श्रीमती मोनीका राऊत, अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा., श्री अशोक सरबंळकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार श्री. सुरेश मट्टामी, सपोनि श्री. पंकज वाघोडे, पोउपनि श्री. अर्जुन राठोड, नापोशी राजेन्द्र रेवतकर, पोशि सचिन येळकर, चापोहवा गुणेश्वर डाखोळे यांनी केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर